# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक १२.०५.२०२६ मंगळवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ११.०५.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०७ केसेसमध्ये ०७ ईसमांवर कारवाई करून ९,२६०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०३ केसेसमध्ये ०३ ईसमांवर कारवाई करून ५,१००/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,१९८ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,५१,०५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ३ पोलीसांची कामगीरी :— घरफोडीचा गुन्हा उघडकीस.**

दिनांक ०७.०५.२०२६ चे २०.०० वा. ते ०८.०५.२०२६ चे १९.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत, प्लॉट नं. ७६, गजानन नगर, नरसाळा रोड, नागपुर येथे मोरेचे घरी किरायाने राहणारे फिर्यादी मिलींद बबनराव वाघमारे, वय ३८ वर्षे हे त्यांचे राहते घराला कुलुप लावुन, परिवारासह चंद्रपूर येथे नातेवाईकाचे लग्नसमारंभाकरीता गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलुप तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी कपाटातुन चांदीचे वेगवेगळे दागिने व एक आयफोन असा एकुण ३३,५००/— रू. चा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३) ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ३ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून, मिळालेल्या खत्रीशीर माहितीवरून सापळा रचून दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेवुन, त्यांना विचारपूस केली असता, त्यांनी वर नमुद घरफोडीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. विधीसंघर्षग्रस्त बालकांचे ताब्यातुन चांदीचे दागीने व ॲपल कंपनीचा मोबाईल फोन असा एकुण ७०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. विधीसंघर्षग्रस्त बालकांना मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव हुडकेश्वर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री.

राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. महेश सागडे, व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ११.०५.२०२६ चे १५.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचे काका नामे प्रकाश गजानन वैद्य, वय १९ वर्षे, रा. ए/२२, राय टाऊन, इसासनी, नागपूर हे पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. हद्दीत पंचशीलनगर चौक, हिंगणा रोड येथून पायदळ जात असता, त्याचे मागून येणाऱ्या एका अज्ञात ऑटो चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन त्यांना धडक देवुन, गंभीर जखमी करून पळून गेला. जखमी फिर्यादीचे काका यांना उपचाराकरीता लता मंगेशकर हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी पंकज प्रद्युम्न वैद्य, वय ४१ वर्षे, रा. ७४, दत्तगुरू जिवन छाया सोसायटी, स्वावलंबी नगर, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. येथे मपोउपनि. किशोरी माने ९५९४९६५३९० यांनी अज्ञात ऑटो चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१), २८१ भा.न्या.सं., सहकलम १३४, १८७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे जरीपटका :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १०.०५.२०२६ चे ११.०० वा. ते दिनांक ११.०५.२०२६ चे १५.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत, प्लॉट नं. २७/२८, एल.आय.जी. हाऊसिंग बोर्ड कॉलोनी, के.के. नगर, जरीपटका, नागपुर येथे राहणारे फिर्यादी विजय चंदूलाल गिदवाणी, वय ४७ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन, परिवारासह पेंच (म.प्र.) येथे फिरायला गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लाकडी आलमारीतील रोख ५,००,०००/—रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १०,०५,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे पोउपनि. सचिन खुटवळ ९०९६९५३२८६ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५, ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे बेलतरोडी :— सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल.**

दिनांक २८.०४.२०२६ चे ०५.३० वा. ते ०६.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत फ्लॅट नं. ५०३, सिंगापूर सिटी, युरोपिया ०१, गोटाळ पांजरी, नागपुर येथे राहणारे फिर्यादीचे वडिल नामे विलास शालीकराव कटारे, वय ५६ वर्षे, हे गोटाळ पांजरी, सिंगापूर सिटी, युरोपिया ०१, परिसरातील, सिमेंटचे पाण्याचे खाली टाकीमध्ये पडलेले, बेशुध्द अवस्थेत लोकांना दिसल्याने त्यांना उपचाराकरीता, न्युरॉन हॉस्पीटल येथे दाखल केले होते, उपचारादरम्यान दिनांक ३०.०४.२०२६ चे १०.४० वा. चे सुमारास डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले होते. याप्रकरणी यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे अकस्मात मृत्यूची नोंद घेण्यात आली होती.

अकस्मात मृत्युचे तपासात, तसेच फिर्यादी यांची मुलगी नामे कुमारी स्नेहल विलास कटारे, वय २८ वर्षे यांनी दिलेल्या बयानावरून, आरोपी बिल्डर नामे संजू जयस्वाल याने घटनास्थळी पाण्याचे टाकीला कोणतीही सुरक्षा भिंत उपलब्ध करून न देता, गैरजबाबदारपणे व निष्काळजीपणे पाण्याचे टाकीला सुरक्षाजाळी किंवा कठळा लावलेले नसल्याने मृतक हे टाक्यामध्ये पाणी आहे किंवा नाही हे पाहण्याकरीता गेले असता,

त्यांचा तोल गेल्याने खाली पडुन, जखमी झाले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यु झाला. मृतकाचे मृत्युस आरोपी बिल्डर कारणीभुत आहे. अशा दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे मपोउपनि. पुनम खिल्लारे ७०६६१२०५२४ यांनी आरोपी बिल्डर विरूध्द कलम १०६(१) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे सिताबर्डी :—** फिर्यादीचे वडील नामे मोरेश्वर भगवानजी येळणे वय ६६ वर्ष रा. प्लॉट नं. १३, सुदर्शन नगर, राजापेठ, हुडकेश्वर, नागपूर हे वाहन चालक म्हणून अतुल दोषी रा. रामदास पेठ नागपूर यांचेकडे काम करतात. दिनांक ११.०५.२०२६ चे १२.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचे वडील हे प्लॉट नं. ३०, कॅनल रोड मागे, न्यु रामदासपेठ, अतुल दोषी यांचे घरी असलेल्या बेलाचे झाडावर बेलाचे फळ तोडण्याकरीता चढले असतांना त्यांचा तोल जावुन, ते झाडावरुन खाली पडल्याने गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता क्रिम्स किंग्ज्वे हॉस्पीटल येथे दाखल केले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

यांप्रकरणी फिर्यादी आशीष मोरेश्वर ऐळणे, वय ३८ वर्षे, यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे सितावर्डी येथे पोउपनि. पी.एन. भवाळ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**